**शपथेवर उलटतपास ॲड. देवाळकर गैरअर्जदारातर्फे :—**

१२. हे म्हणने खरे आहे की मी गैरअर्जदार यांच्या संस्थेमध्ये कोरपणा येथे लिपीक या पदावर काम करीत होतो. मी कोरपणा शाखेमध्ये दि. ०१/१०/२००४ ते ३१/०५/२०२० पर्यंत कार्यरत होतो. हे म्हणने खरे आहे की मधल्या काळाता सन २०१३ ते २०१५ या काळामध्ये मी संस्थेच्या कोरपणा शाखेमध्ये कार्यरत नव्हतो. हे म्हणने खरे आहे की मला कोरपणा शाखेमध्ये पैशाची अफरातफर केली म्हणून कामावरून कमी केले होते. हे म्हणने खरे आहे की सन २०११ ते २०१२ चा फेर लेखा परिक्षण अहवाल आला होता. हे म्हणने खरे आहे की त्या अहवालामध्ये माझे वर ४,७१,३९९/— रूपयांचा अफरातफर केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. हे म्हणने खरे आहे की सदरचा अहवाल हा विशेष लेखा परिक्षक वर्ग २ यांनी तयार केला होता. हे म्हणने खरे आहे की फेर लेखा परिक्षक यांनी आमच्या विरूध्द दिलेल्या पोलिस तक्रारीनुसार माझे विरूध्द श्री चाफले व श्री बेग कलम ४२०, ४०३, ४६५, ४६८, ४७१ व ४३४ लावण्यात आले होते. हे म्हणने खरे आहे की सदर फौजदारी प्रकरण सध्या चालू आहे सदर प्रकरणात मला अद्याप पर्यंत निर्दोश सोडले नाही. हे म्हणने खरे नाही की माझे विरूध्द फौजदारी प्रकरण सुरू आहे व सदर अफरातफरीची रक्कम वसूल करणे बाकी असल्यामुळे गैरअर्जदार यांनी मला उपदानाची रक्कम दिली नाही. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार यांनी उपदान कायदयाच्या कलम ४ नुसार कारवाही केल्यामुळे मी उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशानुसार माझेवर कार्यवाही केलेली आहे. हे म्हणने खरे नाही की मी माझे शपथपत्रामध्ये नमूद माझी उपदानाची रक्कम रू. ४,२४,२००/— बाकी आहे हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणने खरे नाही की मी सन २०१३ ते २०१५ बेरोजगार होतो व माझे वर चुकीची कार्यवाही केली हे मी चुकीचे नमूद केलेले आहे. हे म्हणने खरे नाही की मी १९९८ ते २०२० पर्यंत सलग व अखंडित २१ वर्षे गैरअर्जदार यांच्याकडे सेवा केली हे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणने खरे नाही की मी सदर रक्कमेवर १२ टकके व्याजाची खोटी मागणी केली आहे.

हे म्हणने खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले असून आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण झाला. माझे समक्ष

फेर तपास नाही. स्वा/—

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश
दि. २५/०२/२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर.